७. मी जिल्हाधिकारी अमरावती महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२(अ) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियमावली १९६९ चे नियम ८ व ९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मौजा पेठ अमरावती ता. अमरावती येथील शेत शेत स.नं. **६४** मधील क्षेत्र. **०.०९ हे.आर** जमीन ही **निवासी** प्रयोजनार्थ वापर करण्यासाठी अकृषिक आकारणी खालील अटी व शर्तीवर निश्चित करीत आहे.

अटी व शर्ती

१. सदर परवानगी उक्त अधिनियम अंतर्गत व त्यावरील होणाऱ्या नियमाअंतर्गत देण्यांत येत आहे.

२. सदर जमिनीला ज्या कारणाकरीता अकृषिक आकारणी निश्चित करून दिली आहे, त्याच प्रयोजनाकरीता वापरण्यास बंधनकारक राहील, उक्त वापरास सक्षम प्राधिकाऱ्याचे परवानगी शिवाय जमीनीवरील बांधकामाचा उपयोग इतर दुसऱ्या प्रयोजनार्थ करणार नाही.

३. प्रस्तावित भुखंडाचे भविष्यात या कार्यालयाचे पुर्व परवानगी शिवाय विभाजन करता येणार नाही.

४. मंजुर अभिन्यासा प्रमाणे रस्ते, नाल्याचे बांधकाम एक वर्षाचे आंत करील व याबाबत स्थानिक प्राधिकरण कडून समाधानकारक दाखला प्राप्त करावा.

५. खुली जागा व रस्ते स्थानिक प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करावे.

६. अर्जदार अथवा वैयक्तिक खातेदार यांनी बांधकाम सुरू करण्यापुर्वी स्थानिक प्राधिकरणाची रितसर परवानगी घ्यावी.

७. उपअधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडून जमिनीची मोजणी करून त्याप्रमाणे आखणी करून घेईल व तया जमिनीचा संपुर्ण विकास करेल.

८. अर्जदाराने जमीनीचा प्रत्यक्ष अकृषिक वापर केल्याबाबत अहवाल एक महिन्याच्या सादर करावा.

९. प्रत्यक्ष मोजणी प्रमाणे येणाऱ्या क्षेत्रफळानुसार क्षेत्रफळ आकारणी लागु राहील.

१०. सदर जागेत अस्तिवातील वृक्ष हे बांधकाम करतांना नष्ट करु नये.

११. अभिन्यासातील रस्ते व शेजारचे मंजुर अभिन्यासतील रस्त्यांना योग्य रितीने समन्वय करावे.

१२. भुखंडातुन विद्युत किंवा दुरध्वनी लाईन जात असल्यास ती स्वखर्चाने रस्त्याचे कडेला स्थानातंरीत करावे.

१३. अर्जीत शेतजमिन मधील **निवासी** प्रयोजनार्थ एकूण क्षेत्रफळ ८१०.०० चौरस मिटर आहे. त्यावर वार्षीक अकृषिक आकार **१ रू.३८ पैसे** (अक्षरी एक रूपया अडोतीस पैसे फक्त) प्रति चौरस मिटरप्रमाणे रूपये **रू.१,११८/- (अक्षरी रूपये एक हजार एकशे अठरा फक्त)** कायम करण्यांत येत आहे. ही आकारणी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४.०९.२००१ मध्ये प्रसिध्द झाल्यानुसार आकारण्यांत येत आहे. त्यानंतर जी सुधारणी आकारणी शासन घोषीत करील त्याप्रमाणे भरण्यास अर्जदार हा बंधनकारक असेल.

१४. शासन परिपत्रक क्रमांक एन.ए.१०७९/१४६६/आय.एस.३/महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १९७९ व कलम ४७ हे रूपांतरीत करांत दुरूस्ती प्रमाणे महानगरपालीका क्षेत्रात अकृषिक आकाराच्या पांच पट रूपांतरीत कर भरणे आवश्यक आहे. सदर प्रकरणांत अर्जीत जमीन महानगर पालीका क्षेत्रात असल्यामुळे करीता अर्जदारास रू.५.५९०/- **(अक्षरी रूपये पाच हजार पाचशे नव्वद फक्त)** एवढा रूपांतरीत कर भरावा लागेल.

१५.अ) वरीलपैकी कोणत्याही अटीचे अथवा शर्तीचे उल्लघंन झाल्यास उक्त बाबतीत जे नियम अस्तिवात असतील त्याप्रमाणे जिल्हाधिकारी जो दंड अथवा आदेश देतील ते आवेदकास पालन करण्यास बंधनकारक राहील.

१५.ब) जे बांधकाम जे नियमबाह्य असेल ते पाडण्याचे सक्षम अधिकारी यांचे आदेश आवेदकास बंधनकारक राहतील व अनधिकृत बांधकाम अर्जदाराने स्वत: स्वखर्चाने न पाडल्यास ते शासकीय यंत्रणेमार्फत पाडण्यात येईल व त्यावर होणारा खर्च शासकीय थकीत म्हणून अर्जदाराकडून वसुल करण्यात येईल.

१५.क) शासनाचे परिपत्रक क्रमांक.एन.एन.ए.-१००५/प्र.क्र.२१६/ल-५ दिनांक १९.०९.२००६ चे आदेशास अधिन राहुन ही परवानगी देण्यांत येत आहे.